**<u>निशाणी १७ वरील आदेश दिवाणी किरकोळ अर्ज क.२७/२०१६</u>**

प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार यांच्या विरुध्द दिनांक १५/०२/२०१८ रोजी निशाणी ८ वर उलट तपास नाही असा झालेला आदेश रदद होऊन मिळण्यासाठी केला आहे.

२. अर्जदार याने अर्जावर म्हणणे देवुन या अर्जास लेखी हरकत घेतली आहे.

३. गैरअर्जदार गैरहजर राहिल्याने दिनांक १५.०२.२०१८ रोजी त्याचे विरोधात निशाणी ८ वर उलट तपास नाही असा आदेश झाला आहे. गैरअर्जदार हे थंडी तापाने आजारी होते. त्यामुळे ते त्यादिवशी हजर राहु शकले नाहीत व वकिलांनाही योग्य ती माहिती नसल्याने सदर दिवशी अर्जदाराचा उलट तपास घेता आला नाही असे गैरअर्जदाराचे कथन आहे. सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निकाल होण्याकरीता सदर गैरअर्जदारास उलटतपासाची संधी देणे योग्य होईल असे माझे मत आहे. परिणामी मी खालील आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नि.१७ खर्च रुपये ३००/— आकारुन मंजूर केला आहे.

२. निशाणी ८ वरील दिनांक १५.०२.२०१८ रोजीचा गैरअर्जदार विरुध्द झालेला उलट तपास नाही असा आदेश रदद केला आहे.

दिनांक ०५.०७.२०१८

(रा. अ. सासने )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर
पंढरपूर

**CERTIFICATE**

**I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original order**

**a) Name of the stenographer KONDEKAR B.R.**

**b) Court : C.J.S.D. Pandharpur**

**c) order signed by P. O. on : 05/07/2018**

**d) order uploaded on : 05/07/2018**